स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्र देशात प्रथम

रत्नागिरी

ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे ८७.५७ लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला असून राज्याच्या या यशात महावितरणची ८५.८५ लाख स्मार्ट मीटरसह प्रमुख कामगिरी आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात ऊर्जा परिवर्तन चालू आहे. सौर कृषी पंप बसविण्यासह विविध बाबतीत महाराष्ट्राने देशात ऊर्जा क्षेत्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. आता स्मार्ट मीटर बसविण्यातही महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आले आहे.

शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. राज्यात ९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

स्मार्ट मीटर बसविण्याच्या बाबतीत दि. १० फेब्रुवारीपर्यंतच्या ताज्या आकडेवारीनुसार ८७.५७ लाख स्मार्ट मीटरसह महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून बिहार (८६.४४ लाख) व उत्तर प्रदेश (८२.७५ लाख) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत.

> **स्मार्ट मीटरचे लाभ**
> - शंभर टक्के अचूक बिल
> - ग्राहकाला दर तासाला मोबाईलवर वीजवापर समजतो
> - दिवसाच्या वीजवापरसाठी वीजदरात टीओडी सवलत
> - ग्राहकाला वीज वापरावर नियंत्रण ठेवणे आणि वापराचे नियोजन करण्याची सुविधा

विजेचा वापर कोणत्या वेळेला झाला त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला टाईम ऑफ डे (टीओडी) सवलत म्हणतात. स्मार्ट मीटरमध्ये अशा प्रकारे वेळेनुसार वीजवापर मोजण्याची सुविधा आहे व ग्राहकांनाही त्यांच्या मोबाईल फोनमधील ॲपमध्ये दर तासाला आपल्या घरात अथवा कार्यालयात किती वीज वापर होत आहे, हे समजते. स्मार्ट मीटरमुळे घरगुती ग्राहकांनाही टीओडी सवलत सुरू केली आहे. राज्यातील ५४ लाख ४२ हजार घरगुती ग्राहकांना जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या सात महिन्यांच्या मासिक वीजबिलामध्ये तब्बल ५१ कोटी ४२ लाख रुपयांचा लाभ झाला आहे. याखेरीज या कालावधीत लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक ग्राहकांना १०६ कोटी ८९ लाख रुपये, वाणिज्यिक ग्राहकांना ४३ कोटी रुपये, सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी ७ कोटी ३० लाख रुपये तर अन्य ग्राहकांना ६ कोटी ७० लाख रुपये टीओडी सवलत लाभ झाला आहे. याची एकूण रक्कम २१५ कोटी ३५ लाख रुपये होते. उच्चदाब ग्राहकांना या कालावधीत दिवसाच्या वीजवापराबद्दल १३४९ कोटी रुपयांचा टीओडी लाभ मिळाला असून त्यामध्ये औद्योगिक ग्राहकांचा वाटा ११०५ कोटी रुपये आहे.

स्मार्ट मीटर बसविलेल्या ग्राहकांनी मोबाईल फोनमध्ये ॲप डाऊनलोड करून त्यामध्ये आपला वीजवापर नियमित तपासावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

स्मार्ट मीटरच्या बाबतीत स्वयंचलित पद्धतीने वीजवापराचे रिडींग नोंदविले जाते. त्यामुळे ग्राहकाला वीजवापराचे अचूक बिल मिळते. राज्यात स्मार्ट मीटरचा वापर वाढत आहे व त्याचबरोबर बिलिंगच्या तक्रारी कमी होत आहेत. राज्यात बिलिंगच्या तक्रारीचे प्रमाण अर्धा टक्क्यावर आले आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढते या तक्रारीत तथ्य नसल्याचे स्पष्ट होते.

स्मार्ट मीटरमुळे वीजदरात वाढ होईल, असाही एक गैरसमज निर्माण झाला होता. तथापि, राज्यात स्मार्ट मीटर बसविण्यास सुरुवात केल्यानंतर महावितरणने पंचवार्षिक वीजदर निश्चितीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या याचिकेत वीजदर कमी करण्यासाठी परवानगी मागितली आहे. त्यामुळे ग्राहकांना स्मार्ट मीटर मोफत मिळण्यासोबतच त्याचा अप्रत्यक्ष बोजाही पडणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यात सर्व विद्युत फीडरवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून त्यांची संख्या ३०,१६४ आहे तर राज्यात २.८० लाख डिस्ट्रिब्युशन ट्रान्सफॉर्मर्सवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वीज वितरण प्रणालीतील विजेचा नेमका वापर समजण्यास मदत होत आहे. याच्या आधारे वीज वितरण प्रणालीचे प्रभावी व्यवस्थापन करणे, वीजगळती रोखणे आणि प्रभावी एनर्जी ऑडिटसाठी मदत होणार आहे. विजेच्या मागणीचा पॅटर्न अचूक ओळखून त्यानुसार पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी ही आकडेवारी अत्यंत उपयुक्त आहे. आगामी काळात ग्राहकांना ज्या सवलती मिळतील त्या स्मार्ट मीटरमध्ये वेळेच्या आधारे झालेल्या वीजवापराच्या अचूक नोंदीच्या आधारावर असतील. त्यामुळे ग्राहकांकडे स्मार्ट मीटर असणे गरजेचे आहे.

वेचक

कोदवली येथील लाकूड व्यापारी शंकर जामसंडेकर यांचे निधन



राजापूर (वार्ताहर): राजापूर तालुक्यातील कोदवली येथील रहिवासी व नामांकित लाकूड तसेच ट्रक व्यावसायिक काँग्रेसचे कार्यकर्ते शंकर विष्णू जामसंडेकर (६५) यांचे मंगळवार १७ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे मूळ गाव खारेपाटण परंतु ते व्यवसायानिमित्त राजापूर तालुक्यातील कोदवली येथे स्थायिक झाले होते. लाकूड व्यवसायाच्या निमित्ताने त्यांची तालुक्यात ओळख होती. तसेच कोदवली आणि दशक्रोशीत त्यांचे अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. आपल्या मितभाषी स्वभावामुळे ते ओळखले जात. सामाजिक कार्यकर्ते अरविंद लांजेकर यांचे ते मामा होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, तीन विवाहीत मुली, सुना, नातवंडे, भाऊ, पुतण्या असा परिवार आहे.

मराठा महाकुटुंब चिपळूण यांच्यावतीने आज छत्रपती शिवाजी महाराज भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

चिपळूण (प्रतिनिधी):- मराठा महाकुटुंब, चिपळूण यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज भव्य जन्मोत्सव सोहळा आयोजन गुरुवार १९ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. यादिनी सकाळी १०.०० वा महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून भव्य बाईक व कार रॅलीला सुरुवात होणार आहे. या रॅलीचा मार्कंडीपासून शुभारंभ होणार असून त्यानंतर बहादुरशेख, पॉवरहाऊस, खेंड व शेवटी नगरपरिषद अशा मार्गाने ही रॅली निघणार आहे. त्यानंतर दुपारी ३:००वा भव्य शोभायात्रा नगरपरिषद ते छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा मार्कंडी अशी निघणार आहे. यामध्ये पारंपारिक शिव वेशभूषा, साहसी खेळाचे प्रात्यक्षिक, पारंपरिक ढोल ताशा, पारंपरिक गोंधळी संभळ पथक व तुतारी वादन, अश्वनृत्य व हलगी असे विविध वेशभूषा व साहसी खेळांचे प्रदर्शन करत ही रॅली निघणार आहे. दरवर्षी ही रॅली चिपळूणकरांचे आकर्षण ठरत असते. दिवसेंदिवस या रॅलीचे स्वरूप भव्यदिव्य अशा पद्धतीने होत असल्याचे दिसून येते. सायं : ६:०० वा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायं ७:००वा. मान्यवरांचे स्वागत व अल्पोपहार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. चिपळूण नगर परिषदतर्फे सायं ८:०० वा.सांस्कृतिक कार्यक्रम 'गर्जा महाराष्ट्र माझा' हा प्रसिद्ध कार्यक्रम होणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन मराठा रियासत प्रतिष्ठान, चिपळूण आणि मराठा महाकुटुंब चिपळूण तालुका यांच्यावतीने उत्तमरित्या व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले आहे.

आ. किरण सामंत यांचा विश्वास प्रमिल पत्याणे व कार्यकर्त्यांनी लावला सार्थकी

लांजा (प्रतिनिधी)



जि.प., पं.स.च्या निवडणुकीत आमदार किरण सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी प्रचाराचा झंझावात तळागाळातल्या मतदारांपर्यंत पोहचविला. आ. किरण सामंत यांनी निवडून आल्यानंतर विकासात्मक कामांना सुरूवात केल्याचे आश्वासक चित्र अगोदरच जनतेला दिसून आले होते. आता ग्रामीण विकास साधायचा तर जि.प., पं.स.च्या निवडणुकीत महायुतीची सत्ता येणे आवश्यक होते. अशावेळी वाघ्रट गावचे सुपुत्र मुंबईस्थित उद्योजक प्रमिल पत्याणे यांनी खास गावी येत आ. किरण सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांना एकत्रित करीत राजकीय मैदानातील विजयाची गणिते जुळवून कामाला सुरुवात केली.

खानवली पंचायत समितीची निरीक्षक म्हणून जबाबदारी त्यांच्या खांद्यावर देण्यात आली. यासाठी प्रत्यक्षात जिल्हा परिषद गवाणे गटात त्यांनी तळ ठोकला. कार्यकर्त्यांसमवेत विभागातील प्रमुख लोकांच्या भेटीगाठी घेऊन त्यांनी आपला ठसा उमटवला आणि नंतर प्रत्येक घराघरात महायुतीने केलेली प्रत्यक्ष विकासकामे प्रचाराद्वारे पोहचवली. उद्योजक असले तरी कोणताही बडेजाव न करता सर्वांना सोबत घेणे हे प्रमिल पत्याणे यांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे. कोणताही राजकीय अनुभव पाठीशी नसताना विजयाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आ. सामंत यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी कंबर कसली व नियोजनबद्ध पद्धतीने जोरदार मुसंडी मारत खानवली पंचायत समिती गणात व गवाणे गटात महायुतीचा विजय निश्चित करीत आ. किरण सामंत यांचा विश्वास सार्थकी लावला.

जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ रत्नागिरी / सिंधुदुर्ग

कार्यालयाचा पत्ता- डॉ. आबेंडकर सामाजिक भवन, सिंचन भवन जवळ, रत्नागिरी

क्र. वक्फ / रत्नागिरी, सिंधुदुर्ग / चौकशी /६५/२०२६ दिनांक- १८-०२-२०२६

(जाहीर प्रगटन)

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणे बाबत.

वक्फ संस्थेचे नांव व पत्ता: कोकरे मस्जिद, मौजे. कोकरे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी MSBW/RTG/191/2020

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. परवेज जैनुद्दीन मोडक व इतर यांनी दिनांक १८/०२/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापना करीता वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असुन व्यवस्थापन समीती निवडीची मुदत संपल्यानंतर रिक्त पद हा उर्ववरित कालावधी करीता सर्व साधारण सभेच्या ठरावानुसार भरता येऊ शकते अशी आहे. योजने मध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	विश्वस्तांची नांव	पद
१	श्री. परवेज जैनुद्दीन मोडक	व्यवस्थापकीय अध्यक्ष
२	श्री. इमरान इब्राहिम मोडक	उपाध्यक्ष
३	श्री. फरीद हसन गैबी	सचिव
४	श्री. अजीज दाउद मोडक	सदस्य
५	श्री. अमीर मलिक हसरत काझी	सदस्य
६	श्री. मोहम्मद सलीम हुसैन झगडे	सदस्य
७	श्री. सैफ नझीर म्हाते	सदस्य

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रार आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, आंबेडकर भवन, डी मार्ट समोर, रत्नागिरी यांचेकडे आपले लेखी म्हणणे दाखल करावे, विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दाखल घेण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सही-
जिल्हा वक्फ अधिकारी,
रत्नागिरी व सिंधुदुर्ग

कोळंब शाळेत नवनाथ चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत वह्या वाटप



राजापूर (वार्ताहर):

जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कोळंब येथे नवनाथ वैद्यकीय शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्यामार्फत सुमिक्षा धोपावकर यांच्या हस्ते मोफत वह्या वाटप करण्यात आले. यासाठी शाळेचे माजी विद्यार्थी किसन नारायण पाटेकर यांनी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमप्रसंगी बोलताना श्रीम. धोपावकर यांनी ग्रामीण भागातील मुलांच्या प्रगतीसाठी आणि त्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी संस्था प्राधान्याने काम करत असल्याचे सांगितले. तसेच मुलांनी आपले ध्येय ठरवून त्यासाठी परिश्रम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

वह्या वाटप कार्यक्रमप्रसंगी श्रीम. धोपावकर, किसन पाटेकर, नारायण पाटेकर, राधा पाटेकर, समीक्षा पाटेकर, सत्यवान पाटेकर, विश्वनाथ पाटेकर तसेच शाळेचे शिक्षक वृंद, जयेश तेलंग, जयवंत पवार, विजयकुमार माने, प्रणाली मोरे आणि विद्यार्थी उपस्थित होते. संस्थेच्या या शैक्षणिक कार्याबद्दल परिसरात कौतुक केले जात आहे.

जाहीर निविदा
RES/SR/LH/F/156/2026

'रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी', रत्नागिरी या संस्थेने गोगटे जोगळेकर महाविद्यालय आवारातील, विद्यार्थिनी वसतीगृह इमारत Stilt+ Ground Floor+4 (6 Slab) मजली इमारत नव्याने बांधण्यात आलेली असून सदरहू विद्यार्थिनी वसतिगृहासाठी आवश्यक फर्निचर (उदा. किचन साहित्य, स्टील टेबल्स- खुर्च्या, खाट (बेड), कपाटे, रॅक इ.) फर्निचर पुरवठा स्थापनेकरिता पुरवठाधारकांकडून निविदा मागविणेत येत आहे.

तरी इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाचे कालावधीत संस्था कार्यालयातून निविदा फॉर्म (टेंडर फॉर्म) घेऊन दिलेल्या नमुन्यामध्ये भरून सिलबंद लखोट्यातून सादर करावी. निविदेसोबत पुरवठाधारकाचे GST प्रमाणपत्र, PAN कार्ड, गेल्या ०३ वर्षाचा आर्थिक उलाढाल अहवाल, अनुभव प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रत्येक निविदे (टेंडर) सोबत रु. १०००/- (एक हजार मात्र) निविदा फी रोख रक्कम स्वरुपात किंवा रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी रत्नागिरी या नावे डी.डी. काढून निविदा सोबत जोडावा. ही निविदा फी Non-refundable असेल. निविदा फी रोख स्वरुपात किंवा डी.डी. स्वरुपात जोडला नसल्यास सदरहू निविदा स्विकारली जाणार नाही. अधिक माहितीसाठी व प्रत्यक्ष निविदा नमूद कामकाज पाहणीसाठी, कार्यवाह, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी, रत्नागिरी यांच्याशी सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११.३० ते दु. १.३० या कालावधीत संपर्क साधावा. संस्थेने सर्वात जास्त अगर कमी दराच्या असणाऱ्या निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा अगर सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

s/d
कार्यवाह
रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी, रत्नागिरी

MANAPPURAM HOME FINANCE LTD. मनप्पूरम होम फायनांस लिमिटेड

पूर्वी मनप्पूरम होम फायनांस प्रा. लि. म्हणून ज्ञात • सीआयएनः यू६५९२३केएल२०१०पीएलसी०३९१७९

नोंद कार्यालयः ८/५९६ ए, पद्मप्रभा बिल्डींग, श्रीराम स्वामी मंदिराजवळ, चेरप्पू – त्रीप्रयार रोड, त्रीप्रयार थ्रिसुर, केरला – ६८०५६७ दूरध्वनी क्र.: ०४८७ - ३५२०५०४, संकेतस्थळ : www.manappuramhomefin.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे **मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड ("महोफिन")** चे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड सिक्युरिटी इंटरेस्ट *[ॲक्ट], २००२ (५४/२००२) च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ९ अंतर्गत वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (१२) च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार आणि सहकर्जदारांना नोटीस मध्ये नमूद करण्यात करण्यात आलेली रक्कम आणि त्यावरील व्याजाचा भरणा करण्यासाठी नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी **डिमांड नोटीस** जारी करण्यात आली होती. कर्जदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे कर्जदार आणि सामान्य जनता ह्यांना ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा नमूद नियमांच्या नियम ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद [कायद्याच्या] कलम १३ (४) च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **सांकेतिक ताबा** घेतला आहे. विशेषतः कर्जदार आणि सर्व जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार झाला असल्यास मनप्पुरम होम फायनांस लि. ह्यांच्याकडे संबंधित प्रत्येक मालमत्तेच्या समोर देण्यात आलेल्या रकमेचा भरणा करण्यास बाध्य असाल.

अनु क्र.	कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक/ शाखा	ज्यावर स्वास्थ्य निर्माण करण्यात आले आहे त्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन	पाठविण्यात आलेल्या डिमांड नोटीसचा दिनांक आणि थकीत रक्कम	ताबा सूचनेचा दिनांक
1	गोविंद भिकाजी राऊळ, रसिका भिकाजी राऊळ, साबाजी भिकाजी राऊळ /एनएचएल००४९००११२२३/ कुडाळ	कोन ग्रामपंचायत अनधुराला, घर क्र. १२६७, राऊळवाडी, ता. कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग ४१६५२०, महाराष्ट्रमधील ग्रामपंचायत अनधुराला घर क्र. १२६७, चा सर्व खंड आणि भूखंडावरील १८४९.०० चौ. फू. चे असलेले बांधकाम, घर क्र. १२६७. पूर्व: अंतर्गत रोड, पश्चिम : खुली जागा, दक्षिण : श्री बाबुराव राऊळ यांची जागा, उत्तर : रसिका राऊळ यांचे कंपाउंड	०८-११-२०२५ आणि रु. ४२९७०२/-	14-02-2026
2	शर्मिला प्रशांत वराडकर, प्रशांत शशिकांत वराडकर, गौरी विक्रमादित्य शेट्ये /एनएलएपी००४३०२५७२९/ रत्नागिरी	सदनिका क्र. २०१, २ रा मजला, स्वस्तिक अपार्टमेंट, क्षेत्रफळ ६४० चौ. फू., एस. क्र. ४४३/१/२डी/२१, ०-०६-०० एचआर पैकी गाव मौजे नाचणे, ग्रामपंचायत नाचणे, ता. आणि जिल्हा रत्नागिरी, महाराष्ट्र, पिनः ४१५६३९, पूर्व सदनिकाः सदनिका क्र. २०२/ मालमत्ता : एच. क्र. १/२ डी/२२, पश्चिमः सदनिका : खुली जागा/ मालमत्ता : एच क्र. १/२ डी/२०, दक्षिण सदनिकाः सदनिका क्र. २०४/ मालमत्ताः रत्नागिरी कजरघाटी रोड, उत्तर- सदनिका : खुली जागा/ मालमत्ता : एच. क्र. १/२/डी १६	१३-११-२०२५ आणि रु. ५२४२७३/-	14-02-2026

दिनांक: ११ फेब्रुवारी २०२६, ठिकाण : महाराष्ट्र सही/- प्राधिकृत अधिकारी, मनप्पुरम होम फायनांस लि.

रत्नागिरी येथील मे.अपर तहसिलदार सो. यांचे न्यायालयात

कुळ वहिवाट दावा क्र. 34/2025, 37/2025, 38/2025, 39/2025

विपुल अरविंद साळवी ... अर्जदार
विरुद्ध
श्रीमती शकुंतला राजाराम साळवी वगैरे ... सामनेवाला

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी सामनेवाला क्र. 1 ते 3 याचेविरुध्द गाव मौजे मालगुंड ता.जि.रत्नागिरी येथील खालील नमूद मिळकती संदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम 1948 चे कलम 32(ग) आणि 32 (ओ) अन्वये विक्री अर्ज दावा अर्ज या न्यायाधिकरणाकडे दाखल केला आहे.

दावा मिळकतीचा तपशील

गावाचे नाव	भूमापन क्र	क्षेत्रफळ (हे आर)	आकार (रु. पै)	दाव्याचे क्षेत्र (हे. आर)
मालगुंड	156/2	0-16-00	0.06 रु. पै.	संपूर्ण
मालगुंड	157/11	0-08-00	0.03 रु. पै.	संपूर्ण
मालगुंड	139/15	0-13-00	0.05 रु. पै.	संपूर्ण
मालगुंड	157/8	0-12-00	0.05 रु. पै.	संपूर्ण

त्याअर्थी तुम्ही सामनेवाला क्र. १) श्रीमती शकुंतला राजाराम साळवी रा. तुलसी सानिध्या को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. प्लॅट नं. 201, सी-विंग, जांभूळ फाटा, कॉलेज चिखलोली समोर, कल्याण बदलापूर रोड, अंबरनाथ वेस्ट, ता. अंबरनाथ, जि. ठाणे 2) सखाराम देवजी साळवी 3) नारायण देवजी साळवी 2ते 3 रा. रा. मालगुंड, ता. जि. रत्नागिरी यांना अर्जदार यांनी पुरविलेल्या व त्यांना ज्ञात असलेल्या पत्यावर नोटीस काढूनही बजावणी झालेली नाही. त्यामुळे सदर दाव्याचे कामी आपले म्हणणे मांडण्याकामी / जबाब देण्याकामी तुम्हाला तसेच तुमचे वालीवारस यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, दि. 16/03/26 रोजी सकाळी 11.00 वाजता या न्यायालयात आपण स्वतः अगर आपल्या वकिलांमार्फत हजर रहावे व आपले म्हणणे सादर करावे.

उपरोक्त दिवशी तुम्ही स्वतः अगर वकिलामार्फत या न्यायालयात हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जदार यांच्या दावा अर्जाची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 18/02/26 रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली.

दिनांक - 18/02/26 सही/- (सचिन गोसावी)
(शिक्का) अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण रत्नागिरी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रत्नागिरी विभाग, रत्नागिरी

शमुको- वाय ३७- २०,०००-७, २००८ नमुना क्र. ७५

जावक क्रमांक /३५९/२०२६

सुरभी अपार्टमेंट, एस. व्ही. रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी
पिन क्रमांक - 415612 दिनांक १७/०२/२०२६

चौकशीची जाहीर नोटिस

चौकशी अर्ज क्रमांक : ०४७/२०२६

सार्वजनिक न्यासचे नांव :- श्री देव विश्वेश्वर मंदिर ट्रस्ट, सोलगाव, भटवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

अर्जदार :- श्री. दिनकर श्रीपाद खांडेकर

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी विभाग, रत्नागिरी हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन)

अ क्र	वस्तूचे नांव	नग	अंदाजे किंमत
१	घंटा (पितळेची)	४	रु. ४८००/-
२	समई (पितळेची)	२	रु. ३०००/-
३	चौरंग (लाकडी)	१	रु. १८००/-
४	ढोल	३	रु. २१००/-
५	कपाट	१	रु. ४०००/-
६	ताट (स्टील)	५	रु. १२००/-
७	ताम्हण	२	रु. ८००/-
	एकूण		रु. १७७००/-

(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन)

गाव मौजे : सोलगाव ता. राजापूर, जि. रत्नागिरी. येथील भूमापन क्रमांक व उपविभाग : १५/२ क्षेत्र -१.०५.०० आकार-०.४४ मधील श्री विश्वेश्वर मंदिर मालमता क्र. २७०, चिरेबंदी कौलारू मंदिर- क्षेत्रफळ ३८ फूट X २८ फूट = १०६४ चौ. फूट, सभागृह क्षेत्रफळ- ३५ फूट X २८ फूट = ९८० चौ. फूट ज्याचे अंदाजे मूल्य -१३,३५२/-

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी **कैफियत दि. २५/०३/२०२६ रोजी** किंवा ही नोटिस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाची निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक. १७/०२/२०२६ रोजी दिली.

सही/- (सु. वा. बनकर) वरिष्ठ लिपिक (शिक्का) सही/- (संदीप रा. चक्के) अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रत्नागिरी विभाग, रत्नागिरी.

नोटीस
मे.उपविभागीय दंडाधिकारी उपविभाग राजापूर यांचे कार्यालय

क्रमांक-ज.मृ.अ.नं. - 210/2024
दिनांक - 02/01/2026

1. श्रीम. चित्रा कौस्तुभ दातार ... अर्जदार
(पुर्वाश्रमीची - चित्रा वसंत ढवळे)
रा. दोनिवडे ता. राजापूर जि. रत्नागिरी
विरुध्द
1. गटविकास अधिकारी पंचायत समिती राजापूर ... सामनेवाले
ता. राजापूर जि. रत्नागिरी

ज्याअर्थी अर्जदार श्रीम. चित्रा कौस्तुभ दातार (पुर्वाश्रमीची - चित्रा वसंत ढवळे) रा. दोनिवडे ता. राजापूर जि. रत्नागिरी यांचा जन्म नोंद दाखला मिळणेबाबतचे अर्ज प्रकरण या न्यायालयात दाखल झाले आहे. अर्जदार चित्रा कौस्तुभ दातार (पुर्वाश्रमीची - चित्रा वसंत ढवळे) यांचा जन्म दिनांक 23/03/1971 रोजी मौजे दोनिवडे ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे झालेला आहे. परंतु सदर जन्माची नोंद सरकारी दफ्तरी करणेची राहुन गेलेली आहे. सबब अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यासाठी आदेश पारीत करणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसव्दारे जाहीर कळविणेत येते की, अर्जदाराचे उपरोक्त मागणीस कुणाचीही हरकत असलेस, त्यांनी या न्यायालया समोर दिनांक 25/03/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता स्वतः हजर राहुन हरकत नोंदवावी. सदर बाबत वेळीच कोणतीही हरकत न आल्यास हरकती नाहीत असे समजुन अर्जदार श्रीम. चित्रा कौस्तुभ दातार (पुर्वाश्रमीची - चित्रा वसंत ढवळे) यांचा जन्म दिनांक 23/03/1971 रोजी मौजे दोनिवडे ता. राजापूर जि. रत्नागिरी या गावात झालेबाबत नोंद उशिराने करणे विषयी व त्यांची जन्माची नोंद होणेसाठी आवश्यक ते कायदयानुसार आदेश करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

आज दिनांक 02/01/2026 रोजी माझे सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली. येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

(शिक्का) सही/- डॉ. जॅसमिन (भा.प्र.से) सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी राजापूर

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रत्नागिरी विभाग, रत्नागिरी

शमुको- वाय ३७- २०,०००-७, २००८ नमुना क्र. ७५

जावक क्रमांक /३५५/२०२६

सुरभी अपार्टमेंट, एस. व्ही. रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी
पिन क्रमांक - 415612 दिनांक १७/०२/२०२६

चौकशीची जाहीर नोटिस

चौकशी अर्ज क्रमांक : ०४१/२०२६

सार्वजनिक न्यासचे नांव :- श्री महामाई देवी देवस्थान ट्रस्ट, करंजगाव ता. दापोली, जि. रत्नागिरी

अर्जदार :- श्री. मनोहर गंगाराम जोशी

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी विभाग, रत्नागिरी हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन)

अ क्र	वस्तूचे नांव	नग	अंदाजे किंमत
१	घंटा (पितळेची)	३	रु. २२००/-
२	ताम्हण	२	रु. ७००/-
३	ताट (स्टील)	५	रु. १०००/-
४	निरंजन	२	रु. ३५०/-
५	समई	२	रु. २१००/-
६	ढोल	४	रु. ३६००/-
७	लाकडी चौरंग	१	रु. १६००/-
	एकूण		रु. ११३५०/-

(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन)

गाव मौजे : करंजगाव ता. दापोली, जि. रत्नागिरी. येथील भूमापन क्रमांक उपविभाग : ५७/१ क्षेत्र (अ+ब) - ४.१५.०० मधील महामाई मंदिर करंजगाव, मालमत्ता क्र. ४३३, कौलारू इमारत- क्षेत्रफळ ३० X ३५ = १०५० चौ. फूट.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी **कैफियत दि. २७/०३/२०२६ रोजी** किंवा ही नोटिस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाची निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक. १७/०२/२०२६ रोजी दिली.

सही/- (सु. वा. बनकर) वरिष्ठ लिपिक (शिक्का) सही/- (संदीप रा. चक्के) अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रत्नागिरी विभाग, रत्नागिरी.

punjab national bank — Together for the better

सर्कल ऑफिस मुंबई शहर, यु.बी.आय टॉवर, ६वा मजला, २५, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ • ईमेल : cs6041@pnb.bank.in

सरफेसी कायद्याच्या अंतर्गत प्रतिभूत मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल ८ (६) च्या तरतुदी सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत प्रतिभूत मालमत्तेच्या विक्रीकरीता ई-लिलाव विक्री सूचना.

[illegible]

प्रतिभूत मालमत्तेचे परिशिष्ट

अनु क्र.	शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार/ हमीदारांच्या खात्याचे नाव आणि पत्ता	तारण स्थावर मालमत्तेचे वर्णन/ (तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या) मालकाचे नाव	अ) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेची तारीख ब) कलम १३(२) + व्याज + प्रभार अनुसार थकीत रक्कम क) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत ताब्याची तारीख ड) ताब्याचे स्वरूप : प्रतिकात्मक / प्रत्यक्ष/ रचनात्मक	अ) राखीव मूल्य ब) इरठे (इरठे जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढविणारी रक्कम	ई-लिलावाची तारीख/ वेळ	प्रतिभूत धनकोंना ज्ञात असलेल्या भारांचा तपशील
१	एआरएमबी मुंबई सिटी श्री. सुभाष रामचंद्र फणसमकर	सर्व्हे क्र. ३०१, गट क्र. ११२५- ए/२ (जुना सर्व्हे क्र. ११२५), बंगला क्र. १७, शांतीनगर, गाव लांजा, तालुका - लांजा, जिल्हा - रत्नागिरी - ४१६ ७१२.	[illegible]	[illegible]	२७.०३.२०२६ रोजी स. ११:०० ते [illegible]	ज्ञात नाही

अटी आणि शर्ती :

[illegible]

सरफेसी कायदा, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचना

दिनांक : १९.०२.२०२६
ठिकाण : मुंबई
सही/- प्राधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक

ग्रामपंचायत टेटवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी.
निविदा सुचना

ग्रामपंचायत टेटवली यांजकडील खाली नमुद केलेल्या कामांसाठी नोंदणी झालेल्या मक्तेदाराकडून बी-१ फॉर्ममध्ये मोहरबद निविदा मागविणेत येत आहेत. निविदा रकाना क्र. १० मध्ये नमूद केलेल्या तारखेला १५ वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी सायंकाळी १६ वा. उपस्थित असलेल्या मक्तेदारांसमोर उघडण्यात येतील. निविदेसंबंधी प्रमाणपत्राच्या प्रती जोडण्यात याव्यात. कोऱ्या निविदावे फॉर्म सकाळी १० .३० वाजलेपासून सायंकाळी १४ वाजेपर्यंत रकाना क्र.१० मध्ये नमूद केलेल्या कालावधीत निविदा फॉर्म फी ग्रा.पं.कडे रोखीने भरणा केल्यावर निविदा फॉर्म फी खाली सही करणार यांच्या कार्यालयात दिले जातील व स्विकारले जातील. निविदेसोबत भरावयाची इसारा रक्कम ग्रा.पं.कडे रोखीने भरणा करावी. निविदेसोबत नोदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत विक्रीकर कार्यकंत्राट व व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र इ. स्वतंत्र लखोट्यात द्यावी. नोंदणीकृत ठेकेदाराने निविदा भरण्यास हरकत नाही. आवश्यक कागदपत्र न आढळल्यास निविदा उघडली जाणार नाही. एक अगर सर्व निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे. तसेच निविदा का नाकारण्यात आली याबाबत खुलासा करण्यात येणार नाही. अटीयुक्त निविदा मंजूर करणेत येणार नाही. निविदा ज्यांचे नावे मंजूर झाली असेल त्या मक्तेदाराने सदर कामाचा करारनामा त्वरित पूर्ण करण्याचा आहे. सदर मुदतीत करारनामा पूर्ण न केल्यास सदर मक्तेदाराचा मक्ता रद्द करून पुढील कार्यवाही केली जाईल. ज्या मक्तेदाराचा मक्ता मंजूर होईल, त्या मक्तेदाराने संबंधित कामाचा विमा उतरवून विमा दाखला घेणेचा आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम	निविदा/ मंजुर रक्कम	इसारा रक्कम	सुरक्षा अनामत रक्कम: करारनामा करतेवेळी	सुरक्षा अनामत रक्कम: देयकातून	निविदा फॉर्मची किंमत	मान्यताप्राप्त ठेकेदार वर्ग	कोरे निविदा मिळणेचा दिनांक	निविदा स्विकारणे दिनांक	काम पुर्ण करणेची मुदत
१)	टेटवली येथे घरगुती नळकनेक्शन देणे भाग-१,ता.दापोली	१४६०१३२/-	१४६०१३२/-	१४६०१/-	१४६०१/-	२९२०२/-	१००/-	वर्ग-७	२४/०२/२०२६	२६/०२/२०२६	३ महिने (पावसाळा वगळून)
२)	टेटवली येथे घरगुती नळकनेक्शन देणे भाग-२,ता.दापोली	९८२७०४/-	९८२७०४/-	९८२७/-	९८२७/-	१९६५४/-	१००/-	वर्ग-७			

प्रत- १) मा. गटविकास अधिकारी पं.स. दापोली
२) मा. उपअभियंता जि.प.ग्रापापु/बांधकाम उपविभाग दापोली यांजकडे माहिती व प्रसिद्धीसाठी.

दिनांक : १६/०२/२०२६
सरपंच, ग्रामपंचायत टेटवली/कार्यालय

सही/- सरपंच
ग्रामपंचायत टेटवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.